# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

क्रमांक : ३३३९ /ग-१
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : १० फेब्रुवारी, २०२३

**:: परिपत्रक ::**

विषय: **सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन कालावधीसाठी मंत्रालयीन विभागांनी विधान भवन प्रवेशपत्रिका मिळण्यासाठी अधिकारी/कर्मचाऱ्यांची नावे कळविण्याबाबत...**

महाराष्ट्र विधानमंडळाचे **सन २०२३ चे प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन सोमवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२३** रोजीपासून विधान भवन, मुंबई येथे सुरू होत आहे. सदर अधिवेशन कालावधीत विधान भवन प्रवेशपत्रिका देण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे.

(१) अधिवेशन कालावधीत विधान भवन प्रवेशपत्रिकांसाठी मा.मंत्री महोदयांच्या कार्यालयातील खाजगी सचिव, प्रत्येकी १ विशेष कार्य अधिकारी, स्वीय सहायक, चोपदार व २ शिपाई कर्मचाऱ्यांची नावे 'खाजगी सचिव' यांच्या स्वाक्षरीने दिनांक **२० फेब्रुवारी, २०२३** रोजीपर्यंत या सचिवालयास कळवावीत.

(२) मंत्रालयीन विभागांनी विधान भवन प्रवेशपत्रिकांसाठी जास्तीत जास्त ३० अधिकाऱ्यांची व २० कर्मचाऱ्यांची नावे त्यांच्या विभागाच्या उप सचिवांच्या स्वाक्षरीने दिनांक **२० फेब्रुवारी, २०२३** रोजीपर्यंत या सचिवालयास कळवावीत. जेणेकरून प्रवेशपत्रिका वितरणापूर्वी प्रवेशपत्रिकेवर संबंधितांचे नाव, पदनाम, विभाग इ.माहिती लिहिणे सोईचे होईल. **विलंबाने प्राप्त झालेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

(३) सन २०२३ च्या विधानमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाकरिता प्रवेशपत्रिका उपलब्ध करून घेतल्यानंतर त्यावर सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रवेशपत्रिकाधारकांच्या प्रवेशपत्रिका व अधिकारी गॅलरी प्रवेशपत्रिकांवर संबंधित **अधिकारी/कर्मचारी यांचे छायाचित्र व महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाचा शिक्का असणे अनिवार्य राहील.**

(४) अधिवेशन कालावधीत विधान भवन, मुंबई येथे प्रवेश करताना सुरक्षेच्या दृष्टीकोनातून सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी स्वत:च्या विभागाचे ओळखपत्र व विधान भवन प्रवेशपास विधान भवन इमारतीत प्रवेश करताना दर्शनी भागावर दिसेल अशाप्रकारे लावणे आवश्यक आहे.

(५) मा.मंत्री आस्थापना तसेच, संबंधित मंत्रालयीन विभागाचे दिलेले स्वत:चे ओळखपत्र तसेच विधानमंडळ सचिवालयाने दिलेल्या अधिकृत प्रवेशपत्रिकेवर छायाचित्र असेल तरच विधानभवनात प्रवेश देण्यात येईल.

.. २/-

\\Mlsg101\d\data\g1 backup\BUDGET SESSION 2023\PASS SECTION\PARIPATRAK.docx

(६) अधिवेशन कालावधीत दैनंदिन प्रवेशपत्रिकांची मागणी मा.मंत्री महोदयांच्या स्वीय सहायकांच्या स्वाक्षरीने न करता फक्त **खाजगी सचिव यांच्या स्वाक्षरीने करावी.**

(७) अधिवेशन कालावधीत दैनंदिन प्रवेशपत्रिकांची मागणी कक्ष अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने न करता आपल्या **विभागाच्या उप सचिव यांच्या स्वाक्षरीने करावी. सदरील प्रवेशपत्रिका फक्त ग-१ कक्ष, १७ वा मजला, विधान भवन, मुंबई येथे उपलब्ध होतील.**

(८) अधिवेशन कालावधीत विधानमंडळ परिसर व अधिकारी गॅलरी येथे होणारी गर्दी लक्षात घेता अधिवेशनाच्या कामासंदर्भात दैनंदिन उपस्थित राहणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांकरिता वेळापत्रक तयार करुन प्रवेशपत्रिकांची मागणी करावी.

(९) हिवाळी अधिवेशन, २०२२ साठी घेतलेल्या प्रवेशपत्रिकांच्या दुरूपयोग होऊ नये यासाठी प्रत्येक विभागाने सदर प्रवेशपत्रिका न चुकता परत कराव्यात व त्यानंतर अर्थसंकल्पीय अधिवेशन, २०२३ साठीच्या अधिवेशनाच्या प्रवेशपत्रिकांची मागणी करावी.

वरील सुरक्षाविषयक सूचनांचे अत्यंत काटेकोरपणे पालन करण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे निदेशानुसार कळविण्यात येत आहे.

**(प्रकाश थिटे)**
कक्ष अधिकारी,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रत माहितीस्तव:**

(१) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव, विधान भवन, मुंबई.
(२) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.
(३) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव, विधान भवन, मुंबई.

**प्रति :**

(१) मा.मुख्यमंत्री/उप मुख्यमंत्री/मंत्री यांचे खाजगी सचिव
(२) मंत्रालयीन विभागाचे सर्व प्रधान सचिव/सचिव

**याची प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

(१) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई.